जिस सुबह के अमृत की धुन में हम जहर के प्याले पीते है
इस भुकी प्यासी रूहों पर इक दिन तो करम
फरमाएगी
वो सुबह कभी तो आएगी
माना कि अभी तेरे मेरे अरमानो की किंमत कुछ भी नही.
मिट्टी का भी है कुछ मोल मगर इंसानो की
किंमत कुछ भी नही
इंसानो की इज्जत जब झूटे सिक्को में न
तोली जाएगी
वो सुबह कभी तो आएगी
फाको की चिताओं पर जिस दिन इन्सान जलाए जाएंगे
सीने के दहकते दोजख में अरमान जलाए जाएँगे
ये नरक से भी गंदी दुनिया जब स्वर्ग बनाई जाएगी
वो सुबह कभी तो आएगी
वो सुबह कभी तो आएगी

संकलन
**सदफ कौसर शब्बीर अहमद**

## शायरी

एक पत्थर की भी तकदीर बदल सकती है
शर्त ये है के सलीके से तराशा जाऐ
(मंजुर नदी बालापुरी)

सारे जहाँ से अच्छा, हिंदुस्ता हमारा
हम बुलबुले है इसकी, ये गुलसिताँ हमारा
पर्बत वो सब से उँचा, हमसाया आँसमान का
वो संतरी हमारा, वो पासबाँ हमारा
मजहब नही सिखाता, आपस में बैर रखना
हिन्दी है हम, वतन है, हिंदुस्ता हमारा
कुछ बात है के हस्ती मिटती नही हमारी
सदियों से रहा है दुश्मन दौरे जमाँ हमारा
(अल्लामा इकबाल)

अभी सूरज नही डूबा जरासी शाम होने दो
मै खुद ही लौट जाऊंगा मुझे नाकाम होने दो
मुझे बदनाम करने के बहाने ढूँढ़ते हो क्युँ
मै खुद होजाऊँगा बदनाम पहले नाम होने दो।
नए आगाज में ही हौसला क्यों तोड बैठे हो
सभी कुछ तुम ही जीतोगे जरा अंजाम होने दो

संकलन
**मो. जफर इकबाल**

## प्यार के कटोरे में गंगा का पानी

तुम भी पियो हम भी पिये रब की मेहेरबानी
प्यार के कटोरे में गंगा का पानी
तुम ने भी सवारी है हमने भी सवारी है
ये जमीन तुम्हारी है ये जमीन हमारी है
होलीयो की रंगोंसी ईद की सेवयोसी
मंदिरो की फुलो सी सुबहो की आजनो सी
इस जमीन पे लिखना है प्यार कि कहानी
प्यार के कटोरे में गंगा का पानी

धर्म जो तुम्हारा है धर्म जो हमारा है
धर्म सबका प्यारा है, बस भ्रम ने मारा है
धर्म पे जो लढते है धर्म पे जो झगडते है
अपनी इस बुराई से अपनी इस लडाई से
शर्म से ना हो जाये धर्म पानी पानी
प्यार के कटोरे में गंगा का पानी

कश्मीरवाले हो दिल्ली के जीयाले हो
यु.पी. के हो मतवाले या बीहार के पाले
गीत गाते गुजराती बन के सबरहे साथी
कोई धर्म वालो हो गोरे हो या काले हो
जात हम सभी की है हिन्दूस्तानी
प्यार के कटोरे में गंगा का पानी

संकलन
**राहिला नाजीश**

## सुविचार

अपने शब्दो में मिठास की ताक डाले आवाज में नहीं
क्योंकि फुल बारिश से खिलते है,
तूफानो से नही !

जीवन में किसी का भला करोंगे,
तो लाभ होगा क्योंकि भला इस शब्द का उल्टा
लाभ ही होता है, और जीवन में
किसी पर दया करोंगे, तो वो याद
रखेगा क्योंकि दया इस शब्द का उल्टा याद
ही होता है।

बारिश की बूंदे भले ही छोटी हो...
लेकिन उनका लागातार बरसना बडी
नदियों का बहाव बन जाता है....
वैसे ही हमारे छोटे, छोटे
प्रयास भी जिंदगी में बडा परिवर्तन ला सकते है।

घमंड से अपना सर उँचा न करें
क्योंकि जीतने वाले भी
अपना गोल्ड मैडल सिर
झुका कर लेते है।

दोस्ती का संबंध आँख और हाथ
के रिश्ते जैसा है, क्योंकि जब
हाथ को चोटे लगती है तो आँख
आँसू बहाती है,
और जब आँख रोती है तो
हाथ आँसू पोछने लगता है।

संकलन
**साजेदा परवीन**

# English Section

## Why I Choose to be Happy

Happiness is a choice at least for me, I made the choice when I was 14 I was heaving abused from the age of 6 up until 13 when my mother finally found out and come to rescue me. I spent two years being angry at the entire world for every thing that had happened. I had no friends at my new school. I was outcast and called strange because of my small frame dark eyelids and yellow teeth. I remember being so angry about everything... I took off on my bike and I rode... I rode ... unity I throught my legs would give out. I stopped at a field to rest and I remember just sitting there catching my breath watching the grass sway back and fourth in the wind. That is when I made my choice I decided in that very moment that I was going to be happy because life as chaotic and shitty as it was at the time, it was beautiful.

I wasn't going to care about what had happened to me I decided to learn from it and not be the person my father turned me into or take up his mentality. I wasnot going to care anymore about what other people thought they didn't really know me what was the point right? Because I have to live with me and dictate how I want my life to go because I only have one. It's hard... it is difficult at time absolutely I have lost people that I thought I loved. I have quit very well paying jobs that I throught I loved but at the end of the day I was not happy...

Look inside of yourself truly think about it and find what truly makes you happy. When you have decided on a path pursue it might not be easy you have to work a job you aren't happy with you might feel hopeless you might lose someone you think you love and endure heartbreak. Just remember learn from these they are lessons to be learned on always take steps to move yourself where you want to be.

Collected by
**Ku. Komal Fursule**

---

**The... E... Life!!!**

In this world of E-mails, E-ticket, E-paper, E-recharge, E-transfer and the latest, E-Governance... Never Forget "E-shwar (God)"

Who makes e-verything e-asy fere- veryone, everyday.

"E" is the most Eminent letter of the English alpahabet.

Men or Women don't exist without "E".

House or Home can't be made without "E".

Bread or Butter can't be found without "E".

"E" is the beginning of "existence" and the end of "trouble".

It's not at all in 'war', but twice in 'peace'.

It's once in 'hell' but twice in 'heavan'.

"E" represented in "Emotions". Hence, all emotional relations like Father, Mother, Brother, Sister, Wife & Friends have "e" in them.

"E" also represents 'Effort" & 'Energy'.

Hence to be 'Better' from good both "e" s are added.

Without "e" we would have no love, life, wife, friends or hope & 'see', 'hear', 'smell' or 'taste' as 'eye', 'ear', 'nose' & 'tongue' are incomplete without "e".

Hence Go with "E"

But without E-GO.

Collected by
**Shaziya Parveen**

## Life a learning experience.

Life is a series of tests & decisions, so many things occur in a single day I must accept the challenges & remain strong and not sccumb to elil in any way.
I must try to remain calm and maintain hope,
That all my decisions are the right ones to makes,
I must keep the faith, that he's always with me,
Because in his eyes, I really mate.
Life is a learning experience, a classroom of lieing,
I am talking life's course as each day comes,
Life is not easy, but I am trying my best,
To accept life's challenges that comes with every sunrise.

Collected by
**Chandani K. Chandwani**

## Few Bonds

Few bonds are unexplained
They remain with you, the way they have been since very long.
Just beside you, one hand distanced but,
Its long distance relationship
Long distance between feelings, emotions,
Dreams and thoughts.
We never understand the root behind this gap,
this unsaid problem, we never know
What I know is,
Distance is inversely proportional to the age,
its Unfortunate truth no one deserve it and worth it.

Own Article
**Deepika Kalidas Sonar**

## Everyone you meet...

Be thankful for every person you meet
No matter what their desire
Some walk into your life to
disappoint
Where as other appear to
Inspire
Some people are nothing but
Mistakes
So that lessons can be learned
Others come with ideas and hope
So new pages can be turned
One may break your heart to pieces.
But some else will be the glue
All these people, good or bad
Have melded the perfect you.

Collected by
**Ku. Shalini A. Pandit**

## Keep Faith

There is always gonna be
Another mountain
I am always gonna wanna
Make it move...
Always gonna be an uphill
Battle...
Sometimes I am gonna have
To lose...
Ain't about how fast I get there
Ain't about what's waiting on the
Other side...
It's the limb...
Keep on moving...
Keep limbing...
Keep faith baby...
Keep on moving...

Collected by
**Ku. Harshada R. Korde**

## A Daughter

A daughter is a wonderful blessing.
A treasure from above
She's laughter, warmth and special charm,
She's thoughtfulness and love.

A daughter brings a special joy
That comes from deep inside.
And as she grows to adulthood.
She fills your heart with pride.

With every year that passes,
She's more special than before
Through every stage, though every age,
You love her even more.

No words can describe the warm memories,
The pride and gratitude too,
That comes from having a daughter
To love and to cherish ...
Just like you!

Thought's
i)Manzil milengi, bhatak kar hi sahi
Gumrah to wo hain,
Jo ghar se nikla hi nahi
ii)Believe in yourself and
the world will be at your feet.
-Swami Vivekanand

Collected by
**-Seema Kausar Abdul Sattar**

## Roshan : The Brother

Hey Roshan, You know,
You are God's lovely creation...
God has fulfilled you
With emotions...
That is why helping others is your passion...
So live your life
Keeping this compassion...
And go ahead
For your ambition...
We always found you
Out of every possession...
Always be as you are:
Big hearted, like an ocean...
You are a brother, like a
Healing lotion...
Keep growing up
In a continuous motion...
All the good wishes
For you Roshan...

- Collected by
**Ku. Harshada R. Korde**

Our aim in life should be:
9876543210
9 glasses of water, 8 hours of sleep.
7 Wonders of the world, 6 digit income.
5 days of work/week, 4 wheeler.
3 bedroom house, 2 cute children.
1 sweet heart, 0 tension.

Collected by
**Tahseen Malik**

# महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला हे महाराष्ट्रातील सर्वाधिक जुने व शिक्षण क्षेत्रातील नावाजलेले असे महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाची स्थापना १९५६ साली झाली. शालेय तसेच सहशालेय उपक्रमात अग्रगण्य असलेल्या या महाविद्यालयात शिक्षण स्नातक द्विवर्षीय अभ्यासक्रमाचे दोन वर्ग व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अंतर्गत पुर्नरचित बी.एड.अभ्यासक्रमाचा वर्ग चालविला जातो. अनुक्रमे ५० व ४५ विद्यार्थ्यांना गुणवत्ता क्रमानुसार प्रवेश केंद्रीय पध्दतीने करण्यात आले. महाविद्यालयीन प्रवेश समितीत सचिव म्हणून डॉ. अर्चना वातकर तर डॉ. वसुधा देव, डॉ. नुतन चव्हाण, डॉ.आशा धारस्कर, डॉ. संध्या सामुद्रे, डॉ. संकेत राउत यांनी सदस्य म्हणून कार्य केले.

यावर्षी महाविद्यालयाच्या शैक्षणिक सत्राचा शुभारंभ दि.१४ जून २०१८ रोजी मा. प्राचार्य डॉ. मानेकर यांच्या मार्गदर्शनाने झाला. बी.एड.प्रथम वर्ष विद्यार्थी संसदेचे गठण दिनांक १६ फेब्रुवारी २०१९ ला करण्यात आले. विद्यार्थी संसद २०१७-१९ व २०१८-२० द्वारे संपूर्ण सत्रात विविध दिनविशेष आयोजन करण्यात आले. विद्यार्थी संसदेचा प्रभार डॉ. अर्चना वातकर या सांभाळतात.

उत्कृष्ट निकालांची परंपरा लाभलेल्या या महाविद्यालयाचा द्विवर्षीय अभ्यासक्रम २०१६-१८ चा निकाल १००% आहे. सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहे. नियमीत शिक्षण स्नातक २०१६-१९ च्या परीक्षेत कु. सरिता परशराम चंदन हिने २२०० पैकी १९०२ ८६.४६% गुण प्राप्त क/न महाविद्यालयातुन सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला. तसेच य.च.म.मुक्त विद्यापीठाच्या परीक्षेत कु. प्रज्ञा रोकडे यांनी १३०० पैकी १०९५ ८४.२३% गुण प्राप्त करुन अभ्यास केंद्रातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला.

प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टीने प्रोत्साहन मिळावे यासाठी तयार करण्यात आलेली निरंतर पारितोषिक योजना ही आमच्या महाविद्यालयाची नावीन्यपूर्ण योजना होय. या योजनेत रु.१,९०,०००/- इतकी रक्कम बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात आलेली आहे. प्रत्येक शै. सत्रात ३१ मार्च पर्यंत जमा झालेल्या व्याज रकमेतून या योजनेअंतर्गत नियमित बी.एड. सर्वप्रथम विद्यार्थी व विद्यार्थीनी, सत्रांत परिक्षेतील प्रथम विद्यार्थी, अपंग सर्वप्रथम, मागासवर्गीय सर्वप्रथम विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच य.च.म.मु.वि. सर्वप्रथम असे एकूण १० पारितोषके दिली जातात. सदर योजनेचा प्रभार डॉ. अर्चना वातकर या सांभाळतात.

प्रा.डॉ. रोहीणी तडस या महाविद्यालयात रुजू झाल्याबद्दल महाविद्यालयात त्यांचे स्वागत व प्रा.डॉ. नूतन चव्हाण यांचे शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा येथे व प्रा. डॉ. निलीमा मोरे यांचे शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे सीमांतरण झाल्याबद्दल त्यांचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन. चतुर्थश्रेणी कर्मचारी श्री. प्रमोद देशमुख हे महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाले. त्यांचे पुढील आयुष्य सुखाचे जावो ही सदिच्छा.

महाविद्यालयात IQAC हा विभाग महाविद्यालयाची गुणवत्ता निर्धारण करणारा विभाग आहे. हयात सर्व प्राध्यापक हे सदस्य असून अध्यक्ष मा. प्राचार्य आहे. या विभागातर्फे महाविद्यालयाचा नियोजन आराखडा तयार करण्यात येतो. यावर्षी Internship हस्तपुस्तिकेचे प्रकाशन या विभागामार्फत करण्यात आले. ही हस्तपुस्तिका डॉ.देव व डॉ. धारस्कर यांनी तयार केली असून यामुळे Internship ला एक आयाम प्राप्त झाला आहे. या विभागाचा कार्यभार डॉ. वसुधा देव सांभाळतात.

महाविद्यालयात सुसज्ज असे ग्रंथालय असून २३,००० पेक्षा अधिक ग्रंथसंपदा आहे तसेच वाचनालयात इंग्रजी, मराठी, हिंदी मिळून २० नियतकालिके व मासिके आणि ११ दैनिक वृत्तपत्रे विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध आहे. ग्रंथालय विभागाचा कार्यभार ग्रंथपाल डॉ. संकेत राऊत सांभाळतात.

छात्रसेवाकाळ हा शिक्षणस्नातक अभ्यासक्रमाचा महत्वाचा भाग असून यासाठी अकोल्यातील नामवंत शाळांचे सहकार्य लाभले याबद्दल शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक यांचे महाविद्यालयाच्या वतीने आभार. सदर कार्याचा प्रभार डॉ. आशा धारस्कर सांभाळतात. शालेय अनुबंध या उपक्रमचा प्रभार डॉ. संध्या सामुद्रे या सांभाळतात.

द्विवर्षीय बी.एड. प्रात्यक्षिक अंतर्गत शै. सत्र २०१८-१९ मध्ये मानस शास्त्रीय अध्यापन कौशल्य, मानसशास्त्रीय प्रयोग, शैक्षणिक साहित्य निर्मिती, योग शिक्षण, नाट्य व कला शिक्षण, आय.सी.टी., स्व-

आकलन, कृती संशोधन इत्यादी विषयांवर कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. या कार्यशाळांसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले.

क्षेत्रभेट हा प्रत्यक्ष अनुभवातुन प्रशिक्षण देण्यासाठी बी.एड.अभ्यासक्रमातील नमुद केलेला प्रात्यक्षिकाचा भाग होय. यासाठी प्रा.डॉ.रोहीणी तडस यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कर्ष शिशुगृह व गायत्री बालिकाश्रम या ठिकाणी भेट देण्यात आली. विशेष विद्यार्थ्यांच्या गुणवैशिष्ट्यांच्या अभ्यास करण्यासाठी डॉ. अर्चना वातकर यांच्या मार्गदर्शनाखाली इंदायणी मतिमंद शाळा, कनुबाई वोरा अंध विद्यालय मलकापूर व बालविकास विशेष शाळा या शाळांना भेटी देण्यात आल्या तसेच पालक शिक्षक सभेसाठी मनुताई कन्या विद्यालय या शाळेत क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयात प्लेसमेंट सेल कार्यरत असून या सेलमार्फत Campus Interview चे आयोजन दरवर्षी मार्च महिण्यात करण्यात येते व अनेक विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. या सेलचे कार्य डॉ.वसूधा देव सांभाळतात.

या शैक्षणिक वर्षात मतदार जागृतीसाठी जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये नवमतदार साक्षरता मंडळ तयार करण्यात आले. या मंडळातर्फे वादविवाद स्पर्धा आयोजित करुन राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला तसेच पथनाटय सादर करण्यात आले. या मंडळाचे नोडल अधिकारी म्हणून डॉ. रोहीणी तडस व Campus Ambassador म्हणून द्वितीय वर्षातील विद्यार्थी रौशन वाकोडे हे कार्यरत आहेत.

महाविद्यालयाची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने गौरवाची बाब म्हणजे जिल्हा नियोजन समितीच्या सभेत मा. जिल्हाधिकारी यांनी २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी वर्ग खोल्या, उपहारगृह व सुरक्षा भित यासाठी रक्कम ६२ लाख मंजूर करण्यात आल्याचे घोषीत केले तसेच महाविद्यालयात Research Study Center सुरु होण्याच्या मार्गावर आहे.

प्रशिक्षणार्थ्यांच्या साहित्यीक अभिव्यक्तीला वाव देण्यासाठी दरवर्षी प्रकाशित होणारा अर्घ्य हा अंक प्रकाशनाच्या मार्गावर आहे. या विभागाचे कार्य डॉ. आशा धारस्कर यांचेकडे आहे.

शै. सत्र २०१८-१९ पासून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सूचनेनुसार दिक्षांत समारोहाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. यात द्विवर्षीय अभ्यासक्रम २०१६-१८ या वर्गातील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली तसेच प्रथम तीन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या समारोहाच्या आयोजनाचा प्रभार परीक्षा विभाग प्रमुख डॉ. संध्या सामुद्रे यांचेकडे आहे.

या शैक्षणिक सत्रात दिनविशेष विभागांर्गत शासन परिपत्रानुसार अनेक महापुरुषांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते तसेच वाचन प्रेरणा दिवस मराठी भाषा दिन इत्यादी दिन साजरे करण्यात आले. या कार्याचा प्रभार डॉ. अर्चना वातकर ह्या सांभाळतात.

बी.एड.प्रथम वर्षातील विद्यार्थीनी कु. वैशाली उगले हिने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीच्या बी.ए. परीक्षेत विद्यापीठातून ७वी मेरीट येण्याचा बहुमान प्राप्त केला. महाविद्यालयातर्फे तीचे हार्दिक अभिनंदन.

महाविद्यालयाचे छात्राध्यापक शैक्षणिक संपादणुकीसोबतच अनेक स्पर्धामध्ये सुध्दा सहभागी होतात व क्रमांक प्राप्त करतात. या शैक्षणिक सत्रात द्वितीय वर्षातील कु. वैशाली पांडे व वैभव निंबाळकर यांनी विविध गायन स्पर्धेत भाग घेवून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे तर शिवदास मार्गे यांनी भावगीत व वादविवाद स्पर्धेत प्रोत्साहनपर बक्षिस प्राप्त केले आहे. विपुल तेलगोटे यांनी वादविवाद स्पर्धेत प्रोत्साहनपर बक्षिस प्राप्त केले आहे. कु. दिपीका सोनार यांनी रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेत क्रमांक मिळविला तसेच हरियाणा राज्य क्रिडा कार्यालयातर्फे आयोजीत राष्ट्रीय हॉकी स्पर्धेचे क्रिडा मार्गदर्शक म्हणून कार्य केले. प्रथम वर्षातील कु. वैशाली उगले व निकीता जाधव यांनी वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतला व क्रमांक मिळविला. या सर्वांचे अभिनंदन.

महाविद्यालयाची गुणवत्ता वाढविण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग सुध्दा सतत प्रयत्नशिल असतो. त्यांची संपादणूक खालीलप्रमाणे-

**१. डॉ.वसुधा देव** - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीच्या अभ्यासमंडळावर नियुक्ती. Understanding the self या विषयावर कार्यशाळा. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विदर्भस्तरीय साहित्य संमेलनातअंतर्गत राष्ट्रधर्म या सत्राचे सत्राध्यक्ष, एकुण ७ पुस्तके प्रकाशित झालीत.

**२. डॉ. आशा धारस्कर**- Faculty development programme अंतर्गत रिसर्च मेथॉडॉलॉजी या विषयावर

short term course पूर्ण, शिक्षणाच्या मिती या विषयावरील पुस्तकाचे प्रकाशन, अजंता या आंतरराष्ट्रीय त्रैमासिकात आधुनिक काळातील अध्यापनाचे बदलते स्वरुप व व्यवस्थापन या विषयावरील संशोधन पेपर प्रकाशित, आंतरराष्ट्रीय परीषदेत Womens states in Indian Society या विषयावरील संशोधन पेपर प्रकाशित, Recent advances in language & Social science या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग, सहयाद्री वाहीनीवर व अकोला आकाशवाणीवर मुलाखत पसारीत.

३. **डॉ. संध्या सामुद्रे**– भारतीय शिक्षण या मासिकात माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची भूमिका व व्यावसायिक मूल्ये यातील सहसंबंधाचा अभ्यास या विषयावर रिसर्च पेपर प्रकाशित, बी.एड.अभ्यासक्रमाचे ज्ञान आणि अभ्यासक्रम भाग–२ हे पुस्तक प्रकाशीत, सं.गा.बा.अमरावती विद्यापीठात moderation of paper setting exam committee चे सदस्य.

४. **डॉ. अर्चना वातकर**

Spirtiual कार्यासाठी ब्रम्हकुमारीज आंतरराष्ट्रीय कार्यालय माउंट आबू येथे International Institute for social & economics reforms या विषयावर पेपर प्रसिध्द, शैक्षणिक व सामाजिक कायासाठी International Institute for social & economic reforms बंगलोर तर्फे Dr. APJ Abul Kalam Life Time achivement National Award प्राप्त.

सर्व प्राध्यापकांचे हार्दिक अभिनंदन.

सर्व शैक्षणिक, अभ्यासेत्तर व अभ्यासक्रमांतर्गत प्रात्यक्षिकांसाठी प्राचार्य, पाध्यापक, कायालयीन कर्मचारी या सर्वांचे सहकार्य लाभले सर्वांचे आभार.

मा. प्राचार्य, प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शैक्षणिक वाटचालीसाठी मन:पुर्व अभिनंदन. आयुष्याला नवा आयाम देणारे हे महाविद्यालय. या महाविद्यालयाची अशीच उत्तरोत्तर प्रगती होवो ही प्रार्थना.

**डॉ. अर्चना ग. वातकर**
विद्यार्थी संसद प्रभारी

# शालेय अनुबंध अहवाल

**(School Engagement Report)**

शिक्षण स्नातक द्विवर्षीय अभ्यासक्रमाचा 'शालेय अनुबंध' हा एक अनिवार्य व महत्त्वाचा भाग आहे. प्रथम सत्रात शालेय अनुबंधाचा अवधी ९० तास म्हणजे दोन आठवड्यांचा असावा, असे अभ्यासक्रमात निर्देशित केले आहे. त्यानुसार बी. एड. छात्राध्यापक आपल्या प्रशिक्षणातील एका मोठ्या कालावधीत शाळांमध्ये कार्यरत राहतात.

'शालेय अनुबंध' हा भावी शिक्षकांच्या पूर्वतयारीचा एक अनिवार्य व महत्त्वाचा भाग आहे. या अंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना खालील उद्देशाने शालेय प्रणालीचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

- शाळेला भेट देणे.
- शालेय प्रणालीचे अवलोकन करणे.
- शालेय प्रणालीच्या अवलोकनाअंती त्याचा अहवाल तयार करणे.
- वरील उद्देशांना मूर्तरुप देण्यासाठी खालील बाबींचे अवलोकन करून प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या आधारे अहवाल सादर करावयाचा आहे.

१) आकार आणि शाळेची सुरक्षितता

२) सामाजिक परिमाणे

३) शैक्षणिक परिमाणे

४) शालेय सुरक्षा

वरील सर्व मुख्य मुद्यांच्या अंतर्गत येणाऱ्या उपमुद्द्यांचा सखोल विचार करून मा. प्राचार्य डॉ. मानेकर यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाने, प्राध्यापक वृंदाच्या सहकार्याने एका मार्गदर्शिकेचे विकसन करण्यात आले.

प्रवेशित छात्राध्यापकांच्या संख्येनुसार एकुण ५ गट करण्यात आले. शाळेतील एकुण विद्यार्थी संख्या लक्षात घेवून तेथील शंभर विद्यार्थ्यांमागे बी. एड् चा एक छात्राध्यापक या प्रमाणात विद्यार्थ्यांचे शाळेनिहाय गट करण्यात आले. बी. एड. सत्र –I २०१८–२० चे शालेय अनुबंध या उपक्रमाचे आयोजन दि. १५/०१/२०१९ ते २०/०१/२०१९ या कालावधीत करण्यात आले. या उपक्रमासाठी भारत विद्यालय, अकोला, जागृती विद्यालय, अकोला, जिजाऊ कन्या विद्यालय, अकोला, ज्युबिली इंग्लिश हायस्कुल, अकोला व मनुताई कन्या शाळा, अकोला या पाच शाळांची निवड करण्यात आली. छात्राध्यापकांना शाळेत पाठविण्यापूर्वी या उपक्रमाच्या समन्वयक डॉ. संध्या सामुद्रे यांनी दि. ११/०१/२०१९ ते १४/०१/२०१९ या कालावधीत महाविद्यालयात शालेय अनुबंध कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेत मार्गदर्शिकेच्या आधारे समन्वयक डॉ. संध्या सामुद्रे यांनी शालेय अनुबंध हा भावी शिक्षकांच्या पूर्वतयारीचा अनिवार्य भाग आहे असे सांगितले. त्यासाठी शाळेत सेवेत असणाऱ्या अनुभवी मुख्याध्यापक, शिक्षक, पर्यवेक्षकांच्या सहवासात प्रत्यक्ष कार्य करून शालेय प्रणालीचे अवलोकन करण्याची संधी उपलब्ध होत असून, त्याद्वारे प्रशिक्षणार्थ्यांचे अनुभव विश्व अधिक समृद्ध होते.

शालेय इमारत, परिसर, वर्गखोल्या, संसाधनांची उपलब्धता व उपयोग, विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा, आंतरव्यक्ती संबंधाची गुणवत्ता, विद्यार्थी, मुख्याध्यापक शिक्षक, कर्मचारी, पालक यांचे समन्यायी वर्तन, अध्यापनाची गुणवत्ता, वर्गव्यवस्था, शिक्षक-विद्यार्थ्यांच्या संपादनाविषयीच्या अपेक्षा, शालेय वेळापत्रक निरीक्षण सहभाग इ. बाबी संबंधी मार्गदर्शन करण्यात आले.

शालेय अनुबंध या उपक्रमात सत्र-I च्या प्रशिक्षणार्थ्यांनी उस्फूर्त सहभागी होऊन संपूर्ण शालेय प्रणाली समुदायाचे अवलोकन करून निर्धारित वेळेत अहवाल सादर केला.

बी. एड. २०१८-२० सत्र-II चे शालेय अनुबंधाचा अवधी ३० तास म्हणजे पाच दिवसांचा अहे. त्यासाठी दोन दिवसांची कार्यशाळा समन्वयक डॉ. संध्या समुद्रे यांनी महाविद्यालयात घेतली. मार्गदर्शिकेनुसार सर्व बाबींची माहिती विद्यार्थ्यांना दिली. मतावली, प्रश्नावली संबंधी मुलाखती घेण्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दि. २१/०१/२०१९ ते २३/०१/२०१९ या कालावधीत पाच शाळेत शालेय अनुबंध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सत्र-I साठी घेण्यात आलेल्या शाळेमध्येच संबंधीत विद्यार्थ्यांना पाठविण्यात आले. त्यामुळे या विद्यार्थ्यांना सत्र I व II मधील शालेय अनुबंध उपक्रम पुर्णपणे व्यवस्थित करण्याची संधी मिळाली. प्रशिक्षणार्थ्यांसाठी आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेत समन्वयक डॉ. संध्या सामुद्रे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना वर्गव्यवस्थापन, अनुभवी शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण, शालेय समुदायातील मानवी व भौतिक संसाधनाचे महत्त्व आदी संकल्पना व प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे अवलोकन इत्यादी बाबीसंबंधी मार्गदर्शन केले.

शालेय अनुबंध या उपक्रमात प्रशिक्षणार्थ्यांनी शाळेत जाऊन उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन संपूर्ण वर्गव्यवस्थापन, अनुभवी शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण, शिक्षकांच्या मुलाखती, विद्यार्थी, संवाद कौशल्य, अनुभवी शिक्षक वस्तुस्थितीचे अवलोकन करून निर्धारित वेळेत अहवाल सादर केला.

शालेय अनुबंध उपक्रमासाठी वरील शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक सहकार्य लाभले तसेच या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मा. प्राचार्य डॉ. मानेकर यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. वसुधा देव, डॉ. रोहिणी तडस, डॉ. आशा धारस्कर, डॉ. अर्चना वातकर या सर्व प्राध्यापकांचे प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

**डॉ. संध्या उद्धव सामुद्रे**
सहाय्यक प्राध्यापक व समन्वयक,
शालेय अनुबंध

# स्व-आकलन कार्यशाळा

शासकीय अध्यापक महाविद्यालयात, अकोला येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठा अंतर्गत अभ्यासक्रमानुसार नियमीत शिक्षण स्नातक अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने 'स्व आकलन कार्यशाळा' चे आयोजन दि. ७ जाने २०१९ ते १९ जाने २०१९ पर्यंत होते.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी सकाळी ११.४० वाजता या कार्यशाळेच्या उद्घाटनपर कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. रा. भी. मानेकर होते. तर या कार्यक्रमाच्या समन्वयक म्हणुन प्रा. डॉ. देव यांनी भुमिका पार पाडली. तसेच कार्यक्रमाला डॉ. धारस्कर मॅडम तथा डॉ. तडस मॅडम यांची सुद्धा उपस्थिती लाभली होती. त्यानंतर प्रात्याक्षिकाला सुरूवात करण्यापूर्वी आईस ब्रेकींग पद्धतीने गट तयार करण्यात आले. यात विद्यार्थ्यांना कुठल्याही दोन व्यक्तीबद्दल माहिती घेण्यास सांगितले. त्यानंतर प्रत्येक गटातील दोन व्यक्तीचे सादरीकरण घेण्यात आले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी Who am I ? या विषयावर प्रा. डॉ. देव मॅडम यानी व्याख्यान दिले. त्यामध्ये त्यांनी पंचमहाभुते, तत्त्व, ज्ञानेंद्रिये, कर्मेद्रिये, सप्तधातु, सात चक्र, षडरिपु या सर्व विषयावर सविस्तर चर्चा करून त्याचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर सगळ्याना Who am I ? या प्रश्नाचे उत्तर मिळाले ते म्हणजे I am suprime soul. मी एक शरीर नाही मी एक चैतन्य आहे.

कार्यशाळेच्या तिसऱ्या दिवशी my personality या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. सर्वप्रथम Johary window ही संकल्पना प्रथम स्पष्ट करण्यात आली. त्यासाठी प्रा. डॉ. देव मॅडम यांनी पी.पी.टी. द्वारे मार्गदर्शन केले. त्यानंतर ११ गट तयार करण्यात आले. प्रत्येक गटात ४ प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये प्रत्येक गटामध्ये प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याने गटातील इतर तिघाबद्दलचे दिलेल्या Johary window या वर्कबुकमधील 55 adjectives पैकी 12 Adjective लिहावे. गटातील ३ प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रत्येकी 8 adjectives लिहावे नंतर ते Open area blind area साठी campare करावे जे समोरच्या व्यक्तीचे व स्वतःचे सारखे adjective open area मध्ये लिहावे त्यानंतर १२ पैकी राहिलेले adjectives सर्व hidden area मध्ये लिहावे. त्यानंतर गटातील दोघांनी एकमेकांचे adjectives स्पष्ट करून उत्कृष्ट सादरीकरण केले.

या कार्यशाळेच्या चवथ्या दिवशी understanding myself या विषया अंतर्गत मार्गदर्शन करण्यात आले. मानवाच्या जीवनातील ध्येय, भावना, इच्छा, अपेक्षा या विषयावर सविस्तर माहिती प्रा. डॉ. देव मॅडम यांनी दिली. तसेच पाचव्या दिवशी प्रा. डॉ. देव मॅडम यांनी आम्हाला 'आनंद' या विषयावरील त्यांचे Talk video दाखवले. त्यामध्ये त्यांनी सांगितले की, आपण आपल्या सुखांना दुसऱ्यावर निर्भर ठेवले नाही तर आपण जीवनात नक्कीच आनंदी बनु शकतो. सहाव्या दिवशी प्रा. डॉ. देव मॅडम यांनी प्रशिक्षणार्थ्यांना स्वाध्याय लिहुन घेण्यास सांगितले. त्यानंतर स्वामी विवेकानंद जयंती आणि राष्ट्रमाता जिजाऊ जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली.

सातव्या दिवशी Anger या विषयावर सविस्तर माहिती सांगण्यात आली तसेच रागावर नियंत्रण व रागाचे नियोजन याविषयी प्रा. डॉ. देव मॅडम

यांनी मार्गदर्शन केले. आठव्या दिवशी प्रा. देव मॅडमनी My priorities and values या विषयावर मॅडमनी मार्गदर्शन केले. तसेच आपले जीवन समृद्ध बनवण्यासाठी कोणत्या मार्गाने जावे हे व्हीडीओ क्लिप द्वारे सांगितले 'सत्यम शिवम सुंदरम्' ही मुलभूत मुल्ये या माध्यमातून समजली.

कार्यशाळेच्या नवव्या दिवाशी Swat Analysis याविषयावर सविस्तर माहिती देण्यात आली तसेच ४० स्लाईड पीपीट दाखवून त्यामध्ये आपल्या जीवनातील strength, weakness, opportunity, thareat याविषयी सांगण्यात आले.

दहाव्या दिवशी Attitude या विषयावर प्रकाश टाकण्यात आला. यामध्ये नकरात्मक दृष्टीकोन सकारात्मक कसा बनवता येईल. याविषयी विवेचन करण्यात आले.

कार्यशाळेच्या अकराव्या दिवाशी self control, self analysis, peer pressure या विषयावर प्रा. देव मॅडम यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की चांगल्या हेल्थसाठी स्व-नियंत्रण आणि स्व-नियंत्रणासाठी अष्टांगयोगा चा मार्ग जीवनात अवलंबने आवश्यक आहे. बाराव्या दिवशी Altimate goal of life मोक्षप्राप्ती या विषयावर विवेचन करण्यात आले. कार्यशाळेचा शेवटचा दिवस असल्यामुळे काही प्रशिक्षणार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

**प्रा. डॉ. वसुधा देव**
समन्वयक, स्व-आकलन कार्यशाळा

# सांस्कृतिक कार्यक्रम अहवाल २०१८-२०

दि. १२.०७.२०१८

दि. १२.०७.२०१८ रोजी प्रमिलाताई ओक हॉल येथे महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून 'जननी -२' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थीनी आणि महिला प्राध्यापक उपस्थित होत्या.

दि. ३१.०८.२०१८

दि. १.०९.२०१८ रोजी महाविद्यालयात ब्रम्हाकुमारी सेंटर तर्फे रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य सर्व प्राध्यापक कार्यालयीन कर्मचारी बी. एड्. प्रथम वर्ष व व्दितीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते.

दि. ५.०९.२०१८

दि. ५.०९.२०१८ रोजी महाविद्यालयात शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती पुजन व डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने सुरूवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थांनी आपल्या भाषणातून डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन कु. दिपीका पलन हिने केले तर आभार प्रदर्शन कु. अर्चना धनोकार हिने केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक, बी. एड. प्रथम वर्ष व व्दितीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते.

दि. २.१०.२०१८

दि. २.१०.२०१८ रोजी श्री. रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळ, गीता नगर अकोला यांचे तर्फे युवकांसाठी युवासंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या युवा संमेलनात विविध वक्त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थांना लाभले होते. या संमेलनात महाविद्यालयातील एकुन १५ विद्यार्थांनी सहभाग नोंदविला.

**डॉ. रोहिणी तडस**
सहयोगी प्राध्यापक

# शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा

(Workshop on Teaching Aid)

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रम अंतर्गत द्विवर्षीय बी.एड् अभ्यासक्रम २०१९-२० या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक ४ फेब्रुवारी २०१९ ते ८ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत ज्ञानरचना आधारित शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेची सुरूवात महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. राजेंद्र मानेकर यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. वर्षा पाठक यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आलेल्या उद्घाटन कार्यक्रमाने झाली. डॉ. वर्षा पाठक यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सद्यपरिस्थितील अभ्यासक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानरचनावादाचे महत्त्व पटवून दिले तर मा. प्राचार्य यांनी आपल्या अध्यक्षिय भाषणातून विद्यार्थ्यांचे अध्यपन सहज व अभिरूचिपूर्ण होण्यासाठी शिक्षणातील शैक्षणिक साधने महत्त्वपूर्ण ठरतात असे मत व्यक्त केले. समन्वयक म्हणून डॉ. मानकर यांनी तज्ञ मार्गदर्शकांचा परीचय सर्वांना करून दिला व कार्यशाळेचे प्रास्ताविक भाषण केले.

उद्घाटन कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कु. रुपाली राखोंडे यांनी केले. दिनांक ४ फेब्रुवारी १९ च्या कार्यशाळेच्या प्रथम सत्रात तज्ञ मार्गदर्शन डॉ. वर्षा पाठक यांचे ज्ञानरचनावाद : स्वरुप व अध्यायनातील महत्त्व या विषयावरील व्याख्यानात प्रत्यक्ष कृतीतून विद्यार्थ्यांना अध्ययन करण्यास कसे प्रवृत्त करावे ? यावर मार्गदर्शन केले. दाब व आकारमान यावर प्रत्यक्ष प्रयोग घेवून कृतितून शिक्षण यावर प्रकाश टाकला. यानंतर कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. अर्चना वातकर यांनी कार्यशाळेची रुपरेषा व अहवाल लेखन या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पहिल्या दिवशीच्या दुसऱ्या सत्रात मा. डॉ. आकांक्षा देशमुख यांनी मराठी भाषा शैक्षणिक साहित्य निर्मिती या विषयाअंतर्गत विद्यार्थ्यांना मराठी विषयातील विविध आशय घेवुन शैक्षणिक साहित्याची निर्मिती करण्याबद्दल मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांचे मत तयार करुन, शैक्षणिक साहित्य निर्माण केले. यात विविध प्रकारचे तक्ते, आकार यांचा वापर करून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक साहित्य निर्मीती केली.

दिनांक ५ फेब्रुवारी २०१९ ला डॉ. सिमा मुळे व कु. संध्या पांडे यांनी विज्ञान विषयक शैक्षणिक साहित्य निर्मिती यावर मार्गदर्शन केले. ज्ञानरचनावादावर आधारित विविध प्रयोगांद्वारे विद्यार्थ्यांना अध्ययन करण्यासाठी कसे प्रवृत्त करावे यासंदर्भात प्रत्यक्ष प्रयोग करून दाखविले. विद्यार्थ्यांनी स्वत: प्रयोग करून पाहिले. टाकाऊ वस्तूंपासुन शैक्षणिक साहित्य निर्माण करण्यावर डॉ. सिमा मुळे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. त्याची अध्ययनातील महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. अशाप्रकारे २२ प्रयोग त्यांनी विद्यार्थ्यांकडून करून घेतले.

दि. ६ फेब्रु. २०१९ ला श्री. सुभाष पागृत यांनी गणित विषय शैक्षणिक साहित्य निर्मिती यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना गणितातील विविध आशयावर शैक्षणिक साहित्य निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्य केले. गणितातील प्रमेय तसेच संकल्पना समजण्यासाठी विविध साधनांची निर्मिती विद्यार्थ्यांनी केली.

दि. ७ फेब्रु. २०१९ ला सौ. आकांक्षा देशमुख यांनी इतिहास विषया शैक्षणिक साहित्य निर्माण करण्यासाठी

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इतिहास विषयातील आशयावर आधारित साहित्य निर्मितीसाठी गटांमध्ये विद्यार्थ्यांचे विभाजन करून आशयआधारित पार्टस व मॉडेल्स तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व शैक्षणिक साहित्यांची निर्मिती केली. दि. ८ फेब्रु. २०१९ सकाळी ११.३० बाजता शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन करण्यात आले. या प्रदर्शनीचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. मानेकर यांनी केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याचे मुल्यांकन करून प्रत्येक विषयातील उत्कृष्ट साहित्यीकाला क्रमांक देण्यात आले.

| विषय | क्रमांक | विद्यार्थ्यांचे नांव |
|---|---|---|
| भाषा | प्रथम | मिनल निराळे, चंदा टिकार, ऋतिका देशमुख, मंजुषा तेलगोटे, |
| | द्वितीय | अश्विनी घुसरकर, निकीता जाधव, निर्मला भीरे, वैष्णवी भुईमार, गंगा भेटेकर |
| | तृतीय | चेतन इंगळे, संगीता उगवे, अश्विनी अंभोरे |
| | उत्तेजनार्थ | वैशाली उगले, कोमल इंगळे, पल्लवी काकडे, रुपाली राखोंडे, अनुसया पाचपोर, शारदा हागे, मनिषा चव्हाण |
| सामाजिकशास्त्र | प्रथम | गंगा बेलेकर |
| | द्वितीय | नम्रता अनिस, अश्विनी घुसरकर |
| | तृतीय | चंदा टिकार, अश्विनी अंभोरे |
| | उत्तेजनार्थ | मनोज टिकार, विद्या परख |
| विज्ञान | प्रथम | नेहसिन बानो, दिपाली पवार |
| | द्वितीय | आम्रपाली मनवर, भावना देवहंस, प्रणेती गेडाम |
| | तृतीय | ऐश्वर्या गवई, निकिता उगले, अंकुश वाणे, प्रीती मुंडे |
| गणित | प्रथम | रविंद्र कोहळे |
| | द्वितीय | निकीता उगले |
| | तृतीय | प्रीती चुडे, माधुरी डिवरे, पूनम मुळे निलेश गोपनारायण, प्रशांत मडागे |

महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. मानेकर यांचे अध्यक्षतेखाली दि. ८ फेब्रुवारी २०१९ ला शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेचा समारोप करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमात डॉ. सिमा मुळे, श्री. पागृत व सौ. आकांक्षा देशमुख व्यासपीठावर उपस्थित होते. त्यांनी आपली मनोगत व मार्गदर्शन पर भाषण केले. समारोपीय कार्यक्रमात प्रमुख अतिथी व मा. अध्यक्षांनी क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करतांना सांगितले की साहित्य निर्मिती कार्यशाळेमध्ये साहित्य करतेवेळी आम्ही इतके गुंग झालो होतो की सुट्टीचे सुद्धा आम्हास भान नव्हते, ही कार्यशाळा आम्हास बरेच काही शिकवून गेली. समारोपीय कार्यक्रमाचे संचालन कु. अश्विनी अंभोरे हिने केले तर आभार कु. माधुरी डिवरे हिने मानले.

**प्रा. डॉ. अर्चना ग. वातकर**

(सहाय्यक प्राध्यापक व समन्वयक)

# छात्र संसद अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे नियमीत द्विवर्षीय शिक्षण स्नातक अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासाच्या दृष्टीने बौद्धिक कार्यासोबतच अभ्यासक्रमात अंतर्भूत असलेली अनेक प्रात्यक्षिके व व्यावसायिक विकास कार्यक्षमता कार्यशाळा राबविल्या जातात. या प्रात्याक्षिकांचे व कार्यशाळेचे नियोजन व आयोजन करीत असतांना त्यामध्ये सूत्रबद्धता, नियमीतता, शिस्त व नियोजीतता येण्यासाठी लोकशाही दृष्टीकोणातून प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त निर्माण करणे या प्रमुख उद्देशाने महाविद्यालयामध्ये छात्र संसदेची निर्मिती केली जाते.

द्विवार्षिक शिक्षणस्नातक अभ्यासक्रम २०१७-१९ या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच संसद समितीचे नियोजीत अध्यक्ष मा. डॉ. रा. मि. मानेकर यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती १९९४ च्या विद्यापीठ कायद्यानुसार गुणवत्तेच्या आधारावर विद्यापीठ प्रतिनिधी, विद्यार्थी प्रतिनिधी व महिला प्रतिनिधी यांची निवड करण्यात आली. तसेच सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात असलेल्या विद्यार्थ्यांकडून त्यांनी प्राप्त केलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारावर गुणवत्ता निवड करण्यात आली.

दिनांक ०६/०१/२०१८ ला तयार करण्यात आलेल्या या संसदेत खालील प्रतिनिधी समाविष्ट होते.

| | |
|---|---|
| विद्यापीठ प्रतिनिधी | : कु. मानसी उल्हासराव देशमुख |
| विद्यार्थी प्रतिनिधी | : श्री. वैभव विष्णू निंबाळकर |
| महिला प्रतिनिधी | : कु. हर्षदा रमेश कोरडे |
| सांस्कृतिक प्रतिनिधी | : कु. प्रियंका देवानंद जोशी |
| क्रिडा प्रतिनिधी | : कु. अर्चना जयंत धानोकार, श्री. मिलींद गजानन बावणे |
| प्रसिद्धी प्रमुख | : श्री. रोशन पुरुषोत्तम वाकोडे |

विद्यार्थी संसदेचे उद्घाटन दिनांक ९.१.२०१८ रोजी मा. प्राचार्य डॉ. रा. मि. मानेकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. द्विवर्षीय शिक्षणस्नातक अभ्यासक्रम २०१८-२० या अभ्यासक्रमाची विद्यार्थी संसद संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या विद्यापीठ कायद्याच्या अधिन राहून दि. १६.०२.२०१९ रोजी तयार करण्यात आली. ही समिती खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| विद्यापीठ प्रतिनिधी | : | श्री. सुनिल समाधान मस्की |
| विद्यार्थी प्रतिनिधी | : | श्री. चेतन रविंद्र मनवर |
| महिला प्रतिनिधी | : | कु. आम्रपाली भिमराव मनवर |
| सांस्कृतिक प्रतिनिधी | : | कु. अश्विनी सुधीर घुसरकर |
| क्रिडा प्रतिनिधी | : | श्री. अंकुश रामेश्वर वाणे |

विद्यार्थी संसद २०१८-२० मधील सर्व विद्यार्थ्यांचे मा. प्राचार्यांनी पुष्प गुच्छ देऊन दि. ०१/०३/२०१९ ला अभिनंदन केले.

**डॉ. अर्चना ग. वातकर**
विद्यार्थी संसद प्रभारी

# छात्रसेवाकाळ अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोलाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. वसुधा देव यांच्या प्रेरणेने व समन्वयक डॉ. आशा धारस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१८/०९/२०१८ पासुन आयोजित करण्यात आलेल्या छात्रसेवा काळाचा उद्घाटन सोहळा दुपारी १२ ते १ या वेळेत न्यु इंग्लिश हायस्कूल येथे घेण्यात आला. या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून श्री. माधव मुन्शी मु.अ.न्यु इंग्लिश अध्यक्ष श्री. सुनिल भालेराव मु.अ.ज्युबिली तर प्रमुख अतिथी म्हणून सौ.मेधा देशपांडे मु.अ. जीजाउ हे उपस्थित होते.

सरस्वतीपुजन व दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविकांतर्गत डॉ. वसुधा देव यांनी छात्रसेवा काळात प्रशिक्षणार्थींची भूमिका काय असावी. छात्रसेवाकाळाची संपूर्ण रुपरेषा आणि त्यांची उद्दिष्टे विषद केली. उद्घाटक श्री. माधव मुन्शी यांनी आपलया शाळेची संस्कृती, शिस्त आणि एकूण कायप्रणाली याविषयी मार्गदर्शन केले. सौ. मेधा देशपांडे व श्री. सुनिल भालेराव यांनी सुध्दा प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. ५० दिवसांचा छात्रसेवाकाळ पूर्ण करण्यासाठी शाळा उपलब्ध करुन दिल्याबद्दल डॉ.वसुधा देव यांनी तिन्ही शाळेचे ऋण व्यक्त केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद तसेच शाळेतील मेन्टॉर शिक्षक व विषय शिक्षक उपस्थित होते.

दुपारी १.३० वा. न्यू इंग्लिश हायस्कुलच्या ग्रंथालयात मुख्याध्यापक, मेन्टॉर शिक्षक, प्राध्यापक वृंद आणि बी.एड.प्रशिक्षणार्थींची सभा घेण्यात आली या सभेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

२० ऑक्टोबर २०१८ रोजी घटक नियोजन मार्गदर्शन विषयक कार्यशाळा आयोजीत करण्यात आली. या कार्यशाळेमध्ये गाभा घटक व जिवन कौशलये, अध्ययन निष्पत्ती व आकारिक मूल्यमापन याविषयावर डॉ. आशा धारस्कर, डॉ. संध्या सामुद्रे व डॉ. वसुधा देव यांनी मार्गदर्शन केले.

तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अभ्यासक्रमाच्या अंतर्गत असलेल्या छात्रसेवाकाळ ह्या प्रात्यक्षिकेसाठी महाविद्यालयातील डॉ.वसुधा देव व डॉ. आशा धारस्कर यांनी छात्रसेवा काळ हस्तपुस्तिकेचे लेखन केले आणि दि.३ जानेवारी २०१९ रोजी सावित्रीबाइ फुले जयंती पर्वावर सर्व बी.एड.प्रथम व द्वितीय वर्षाचे प्रशिक्षणार्थी तसेच सर्व प्राध्यापक वृंद व कार्यालयीन कर्मचारी यांच्या उपस्थितीत मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मानेकर यांच्या हस्ते छात्रसेवाकाळ पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. ही पुस्तिका बी.एड प्रशिक्षणार्थ्यांना विनामुल्य देण्यात आली.

१७ डिसेंबर २०१८ ते ०३ जानेवारी २०१९ या कालावधीत मनुताई कन्या शाळा व नुतन हिंदी विद्यालय येथे आयोजीत करण्यात आला होता. तसेच बी.एड.द्वितीय सत्राचा छात्रसेवाकाळ ११ फेब्रुवारी ते ५ मार्च २०१९ या कालावधीत जागृती विद्यालय, सावित्रीबाई फुले जि.प. कन्या शाळा तसेच स्वावलंबी विद्यालय या ठिकाणी आयोजित करण्यात आला. या छात्रसेवा काळ अंतर्गत दि.११/०२/२०१९ ते १६/०२/२०१९ या कालावधीत छात्रसेवा काळ उदबोधन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था अकोला येथील प्रा. जितेंद्र काठोळे व प्रा. भिमसिंग राठोड हे तज्ञ मार्गदर्शक म्हणून लागले.

तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. वसुधा देव, डॉ.रोहीणी तडस, डॉ. अर्चना वातकर व डॉ. संध्या सामुद्रे यांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले.

**डॉ. आशा म. धारस्कर**
प्रभारी व सहा. प्राध्यापक, छात्रसेवाकाळ

## सामाजिक उपक्रम अहवाल

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती अंतर्गत शिक्षणस्नातक या अभ्यासक्रमांतर्गत बी. एड द्वितीय वर्षाकरीता सामाजिक उपक्रमाची जाणिव असावी यासाठी प्रात्यक्षिक राबविण्यात येते. या दृष्टीने या महाविद्यालयात सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. त्यामध्ये दि. १४/०२/२०१९ या रोजी सामाजिक उपक्रम राबविण्यात आला यामध्ये उत्कर्ष शिशुगृह अनाथालय, मलकापूर रोड, अकोला येथे भेट दिली. त्यामध्ये दुपारी ३.०० वाजता सर्व प्राध्यापक वृंद व बी. एड. द्वितीय वर्षाचे सर्व प्रशिक्षणार्थी याचा सहभाग होता. त्यामध्ये प्रा. डॉ. वसुधा देव, प्रा. डॉ. आशा धारस्कर, प्रा. डॉ. रोहिणी तडस, प्रा. डॉ. अर्चना वातकर, प्रा. डॉ. संध्या सामुद्रे या सर्व प्राध्यापकवृंदाचा या उपक्रमात सहभाग होता.

त्यामध्ये अनाथालयात काही वस्तू भेट दिल्या. तसेच त्या आश्रमाचे अध्यक्ष श्री. दादापंत व संचालिका मिराताई जोशी यांचे व्याख्यान आयोजित केले. तसेच संपूर्ण आश्रमाची पाहणी करण्यात आली व प्रशिक्षणार्थ्यांचे समुह छायाचित्र काढण्यात आला. त्यानंतर आश्रमाचा संपूर्ण भेटीचा अहवाल लिखाण करण्यात आले व त्यांचे सादरीकरण करण्यात आले. अशाप्रकारे सामाजिक उपक्रम पुर्ण करण्यात आला.

**प्रा. डॉ. रोहिणी तडस**

सहयोगी प्राध्यापक व समन्वयक

## वादविवाद स्पर्धा व चर्चा

द्विवर्षीय अभ्यासक्रम २०१७-१९ च्या सत्र ३ च्या लिंग, शाळा व समाज या विषयांतर्गत मुली व स्त्रिया व तृतीयपंथीयांच्या अधिकाराचे उल्लंघन या विषयावर वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचा परीक्षण अहवाल या प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | – | श्री. वैभव निंबाळकर |
| द्वितीय क्रमांक | – | कु. हर्षदा कोरडे व<br>श्री. उमेश भगत |
| तृतीय क्रमांक | – | कु. मानसी देशमुख |
| उत्तेजनार्थ क्रमांक | – | श्री. रोशन वाकोडे |

स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी डॉ. नूतन चव्हाण व डॉ. निलीमा मोरे यांचे सहकार्य लाभले. डॉ. वसुधा देव यांचे अध्यक्षतेखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वादविवाद स्पर्धेनंतर प्रत्येक विद्यार्थ्यांनी विषयांतर्गत किमान एक विधान देवून चर्चा घेण्यात आली. अशाप्रकारे लिंग, शाळा व समाज या विषयाचा स्वाध्याय यशस्वीपणे पुर्ण करण्यात आला.

**डॉ. अर्चना ग. वातकर**

(सहाय्यक प्राध्यापक व समन्वयक)

# पालक शिक्षक संघटना उद्‌बोधन कार्यशाळा

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या अभ्यासक्रमानुसार बी. एड्‌ द्वितीय अभ्यासक्रम २०१७-१९ च्या सत्र प्रात्याक्षिका अंतर्गत दिनांक २८ ते ३० जाने २०१९ कालावधीत पालक शिक्षक संघटना उद्‌बोधन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ही कार्यशाळा तीन स्तरावर आयोजित करण्यात आली. प्रथम स्तरावर विद्यार्थ्यांना छात्रसेवाकाळाच्या दरम्यान विद्यार्थी व पालकांच्या शैक्षणिक व सामाजिक अडचणी संदर्भात प्रश्नावली करून घेण्यात आली. पालकांच्या मुलाखतीतून विद्यार्थ्यांच्या समस्यांवर चर्चा करण्यात आली. द्वितीय सत्रावर महाविद्यालयास उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना खालील विषयावर उद्‌बोधन करण्यात आले. हा उद्‌बोधन वर्ग दि. २८ ते ३० जाने २०१९ ला देण्यात आला.

१) पालकांचे कार्य २) शिक्षकांचे कार्य ४) पालक शिक्षक संघटनेचे महत्त्व ४) पालक शिक्षक संघटनेच्या अनुषंगाने शासकीय परिपत्रकांचे अवलोकन ५) पालक शिक्षक संघाची तत्वे ६) पालक व विद्यार्थ्यांकडून भरून घेतलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढणे ७) अहवाल तयार करणे इत्यादी

तृतीय सत्रावर विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटी अंतर्गत प्रत्यक्ष शाळेत जावून कार्य केले. शालेय स्तरावर कार्य करण्यासाठी प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची समिती तयार करण्यात आली होती. यात खालील विद्यार्थ्यांचा समावेश होता.

| | |
|---|---|
| १. वैभव निंबाळकर | - सदस्य सचिव |
| २. हर्षदा कोरडे | - सदस्य |
| ३. मानसी देशमुख | - सदस्य |
| ४. तृप्ती बेलोकार | - सदस्य |
| ५. कोमल फुरसुले | - सदस्य |
| ६. प्रियंका जोशी | - सदस्य |
| ७. रोशन वाकोडे | - सदस्य |
| ८. शिवानंद मार्गे | - सदस्य |

क्षेत्रभेटी अंतर्गत दिनांक ९ फेब्रुवारी २०१९ दु. १ वा. मनुताई कन्या शाळा अकोला येतील पालक शिक्षक संघाच्या समन्वयीका सौ. जिराफे यांचे तज्ञ व्याख्यान आयोजित केले गेले. तसेच दु. ३.०० वाजता शाळेत अस्तित्वात असलेल्या पालक शिक्षक संघ समितीद्वारे पालक सभेचे आयोजन केले आहे. पालक सभे नंतर पालकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेवून विद्यार्थ्यांनी पाल्यांच्या समस्येचे निराकरण करण्यासंदर्भात पालकांना मार्गदर्शन केले. शालेय स्तरावरील कार्य करण्यासाठी शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका डॉ. सिमा मुळे यांचे प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना सहकार्य लाभले. पालक शिक्षक संघटना हे प्रात्याक्षिक गुणवत्तापूर्वक राबविण्यासाठी समन्वयक डॉ. अर्चना वातकर यांनी मार्गदर्शन केले.

**डॉ. अर्चना वातकर**
(सहाय्यक प्राध्यापक व समन्वयक)

# दीक्षांत समारंभ अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय अकोला येथे बी. एड्. २०१६-१८ या शैक्षणिक व्दिवर्षीय अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा पहिला दीक्षांत समारंभ दि. १७ फेब्रुवारी २०१९ रविवार रोजी संपन्न झाला. या समारंभाला महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. राजेंद्र मानेकर हे अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख अतिथींचे स्थान ल. रा. तो. वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथील प्राचार्य मा. डॉ. श्रीप्रभू चापके यांनी भूषविले. या संपुर्ण समारंभाच्या नियोजन व आयोजनाची जबाबदारी समन्वयक म्हणून महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. संध्या उ. सामुद्रे यांनी सांभाळली. व्यासपीठावर मा. अध्यक्ष महोदय, मा. प्रमुख अतिथी व समन्वयक विराजमान होते. समारंभाला सुरूवात होण्यापुर्वी मा. अध्यक्ष, मा. प्रमुख अतिथी व समन्वयक यांना तसेच पदवीकांक्षींना स्कार्प परिधान करण्यासाठी देण्यात आले.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, सरस्वती पुजन व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेच्या पुजनाने या समारंभाला प्रारंभ झाला. शारदास्तवन कु. वैशाली पांडे यांनी गायले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीचे विद्यापीठ गीत सर्वांनी गायले. मान्यवरांचा गुलाबपुष्प व पुस्तके देवून यथोचित सत्कार करण्यात आला. कु. वैशाली पांडे व संच यांनी यावेळी सुरेल स्वरात स्वागत गीताने सर्वांचे स्वागत केले. कु. दिपीका सोनार यांनी अतिथींचा परिचय दिला. मा. अध्यक्ष प्राचार्य डॉ. मानेकर यांनी प्रास्ताविक केले. महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख व महाविद्यालयाविषयी माहिती शब्दांकित करून प्रास्ताविकाव्दारे त्यांनी महाविद्यालयाचा परिचय सर्वांना दिला.

समारंभाचा मुख्य भाग पदवीकांक्षींना पदवी प्रदान करण्याचा सोहळा बी. एड. २०१६-१८ या शैक्षणिक व्दिवर्षात एकूण २० विद्यार्थी होते. मा. अध्यक्ष व मा. प्रमुख अतिथी यांचे हस्ते या पदवीकांक्षींना रितसर पदवी प्रदान करण्यात आली. पदवीकांक्षींनी ती धारण केली. या समारंभाचे औचित्य साधून सुरुवातीला बी. एड. २०१६-१८ या व्दिवर्षीय अभ्यासक्रमात महाविद्यालयातून प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रथम क्रमांकाच्या मानकरी कु. सरिता चंदन, व्दितीय क्रमांक प्राप्त कु. बीना पाठक व तृतीय क्रमांक कु. फातेमा मैदानवाला यांना मा. अतिथींचे हस्ते पदक बहाल करून गौरविण्यात आले. या पदवीकांक्षींना पदवी देण्याचा व प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्याच्या सोहळ्याचे सूत्रसंचालन समन्वयक डॉ. संध्या सामुद्रे यांनी केले. हा संपुर्ण सोहळा विद्यापीठातील दीक्षांत सोहळ्याच्या रितसर पध्दतीनुसार घेण्यात आला.

